## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### प रि प त्र क

विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, श्री. वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी मराठी भाषेच्या साहित्य क्षेत्रामध्ये अत्यंत मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषेला, मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहे. त्याचाच एक भाग म्हणून व मातृभाषेचा गौरव म्हणून श्री. वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिन " मराठी भाषा गौरव दिन'' म्हणून साजरा करण्यात येतो.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त **दिनांक २७/०२/२०१९ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता वि. स. खांडेकर सभागृह (भाषा भवन) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे "बोलू कवतिके'' हा सांस्कृतिक कार्यक्रम विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आलेला आहे.**

सदर सांस्कृतिक कार्यक्रम सुरभी, पुणे निर्मिती प्रमुख श्री. ओंकार भिसे व श्री. मोहन पारसनीस यांचे मार्फत सादर केला जाणार आहे. या कार्यक्रमामध्ये हेमंत वाळुंजकर, संजय मेहेंदळे, अशोक काळे, मंजिरी जोशी व अनुराधा मराठे तसेच सुरभी, पुणे यांचे अन्य कलाकार कला सादर करणार आहेत.

सदर कार्यक्रमास विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवक यांनी त्यांच्या कुटुंबासह उपस्थित राहून सदर कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. तसेच विद्यापीठातील सर्व विद्यार्थी–विद्यार्थिनींनीही सदर कार्यक्रमास उपस्थित रहावे.

कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/444
दिनांक : 26 FEB 2019

**प्रति,**

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी.
३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख.
४. मा.कुलगुरु, मा. प्र–कुलगुरु, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालयास
५. चिफ रेक्टर, मुलांचे व मुलींचे वसतिगृह
६. इंटरनेट विभाग– सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.(Intranet)

टीप – **सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, तसेच विद्यार्थी–विद्यार्थिनी यांच्या निदर्शनास आणावे.**